# *प्रसिध्दीपत्रक*

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१ यांचे मार्फत दि. ०२ फेब्रुवारी २०२१ ते दि. ०६ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-२०२१ (टंकलेखन व लघुलेखन) महाराष्ट्र व गोवा राज्यातून १४१ केंद्रांवर घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेची प्रवेशपत्रे परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर संस्था लॉगिनव्दारे दि.२५/०१/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

संबंधित टंकलेखन व लघुलेखन संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील सर्व परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन शिक्का व स्वाक्षरीसह संबंधित परीक्षार्थ्यांना वितरित करण्याची व्यवस्था करावी. **विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर येताना प्रवेशपत्रासोबत परीक्षा परिषदेने पुरविलेल्या नमुन्यातील स्वयंघोषणापत्र आणणे आवश्यक आहे.**

तसेच अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे ज्या विद्यार्थ्याचे स्वत:चे नाव, आडनाव,वडिलांचे नाव,आईचे नाव,विषय बदल, फोटो बदल, सही बदल इ.बाबत दुरुस्ती असल्यास अशा संबंधित संस्थाचालकांनी (विद्यार्थ्याचा फोटो व ओळखपत्रासह) समक्ष या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन प्रवेशपत्रावर सक्षम प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांची सही व शिक्का घ्यावा, तरच संबंधित विद्यार्थ्यास परीक्षेत प्रविष्ठ होता येईल.

सर्व परीक्षार्थ्यांनी त्यांची ऑनलाईन प्रवेशपत्रे आपल्या टंकलेखन/लघुलेखन संस्थेतुन परीक्षेपूर्वी हस्तगत करावे. **परीक्षा सुरू झालेनंतर कोणतीही दुरूस्ती करून दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

(तुकाराम सुपे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१.

दिनांक :- २५/०१/२०२१
स्थळ :- पुणे

# स्वयंघोषणापत्र

मी श्री./श्रीम.................................................................................................

बैठक क्रमांक :- ............................................ प्रमाणित करतो/करते की, दिनांक ०२/०२/२०२१ ते ०६/०२/२०२१ या कालावधीत होणाऱ्या शासकीय वाणिज्य टंकलेखन व लघुलेखन प्रमाणपत्र परीक्षा (जीसीसी) स्वेच्छेने देत आहे. मला कोरोना संबंधित कोणतीही लक्षणे (सर्दी, खोकला,ताप,श्वास घेण्यास त्रास इ.) नाहीत. मला कोरोनाचा संसर्ग झाल्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे कोणताही वैद्यकीय खर्च देण्यास बांधिल नाही. मी दिलेली माहिती अचूक व खरी आहे.

केंद्राचे नाव :-

केंद्र क्रमांक :-

विषय व बॅच क्रमांक :-

दिनांक :-

विद्यार्थ्याची/विद्यार्थिनीची स्वाक्षरी :-